महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०२ /२०२२ दि. ०४/०१/२०२२

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कोपरी वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील कोपरी ब्रिज येथे नवीन ब्रिज सुरू झाल्याने सध्या जुना कोपरी रेल्वे ब्रिज फेज–२ चे काम सुरू करण्यात येणार आहे. सदर कामाचे दरम्यान जुना कोपरी ब्रिज बंद करून त्याचे जागेवर नव्याने ब्रिज उभारणी करण्यात येणार आहे. सदर ब्रिजचे काम सुरू करण्याकरीता जुना ब्रिज बंद करून सर्व वाहतूक नव्या ब्रिजने वळविण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतुक कोंडी होवू नये तसेच जनतेची गैरसोय होवू नये, वाहतुक सुरळीत व सुरक्षित रहावी, याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, ठाणे शहर म्हणून मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**एक दिशा मार्ग** – सकाळी ०७:०० ते ११:०० या वेळेत तीन हात नाका – गुरूद्वारा – भास्कर कॉलनी हा सेवा रस्ता नाशिक (ठाणे) ते मुंबई कडे असा एक दिशा मार्ग राहील.

**पर्यायी मार्ग** – मुंबई ते नाशिक (ठाणे) अशी जाणारी वाहने ही भास्कर कॉलनी – टेलीफोन नाका येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – सकाळी ०७:०० ते ११:०० या वेळेत रेल्वे ब्रिज ते गुरूद्वारा असा तीन हात नाका येथे येणारा सेवा रस्ता हा भास्कर कॉलनी कट येथे प्रवेश बंद राहील.

**एक दिशा मार्ग** – सायंकाळी १७:०० ते २२:०० या वेळेत भास्कर कॉलनी – गुरूद्वारा – तीन हात नाका हा सेवा रस्ता मुंबई ते नाशिक (ठाणे) कडे असा एक दिशा मार्ग राहील.

**पर्यायी मार्ग** – नाशिक (ठाणे) ते मुंबई अशी जाणारी वाहने ही मल्हार टॉकीज – टेलीफोन नाका – कोपरी रेल्वे ब्रिज येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – सायंकाळी १७:०० ते २२:०० या वेळेत गुरूद्वारा ते रेल्वे ब्रिज असा तिन हात नाका येथे येणारा सेवा रस्ता तीन हात नाका येथे प्रवेश बंद राहील.

सदरची अधिसूचना ही दुचाकी व तीन चाकी वाहनांसाठी एक दिशा मार्ग व पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याकरिता जारी केली असुन दि. ०५/०१/२०२२ रोजी पासुन ०८ दिवस प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणार आहे.

( बाळासाहेब पाटील )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

Scanned with CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर/बृहन्मुंबई/नवी मुंबई
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रतः– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर</u>
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे</u>
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.</u>
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

Scanned with CamScanner